# अघोरी सूड!

आसामचे घनदाट जंगल! दूरवर पसलेलं, विस्तीर्ण आणि जुनाट! उंच वेडेवाकडे वाडलेले वृक्ष तरी किती अगणित! त्या वृक्षांच्या लांबच लांब पसरलेल्या फांद्या एकात एक गुंतून कितीतरी छानदार जाळ्या तयार झाल्या होत्या. त्या सर्व जाळ्यांतून विविध प्राण्यांची वस्ती अगदी बिनधोक वावरत होती. सापांपासून ते सिंहांपर्यंत सर्वांचा मुक्त संचार सगळीकडे होता. त्यातल्या त्यात लक्षात येणारी प्राण्यांची वस्ती म्हणजे अस्वलांची...

या अशा घनदाट जंगलातून निरनिराळे प्राणी पकडून 'राणीच्या बागेकडे' रवाना करण्याच्या कामगिरीवर नेमणूक झाली होती. माझी आणि शैलेंद्र भाटियाची. आम्ही दोघेही कॉलेजपासून एकमेकांचे दोस्त आणि जंगल खात्यात फॉरेस्ट ऑफिसर्स म्हणूनही एकत्र आलो. अशा तऱ्हेच्या निरनिराळ्या जंगलातून कितीतरी विविध अनुभव घेतले होते आम्ही दोघांनी! पण यावेळेस आश्चर्य म्हणजे दोघांची नेमणूक एकाच प्रदेशात व्हावी हा एक योगायोगच होता. पण यावेळेस मात्र आसाममध्ये पाच वर्षे घालवावी लागणार होती!

आणि त्यामुळेच शैलेंद्रच्या वर्तणुकीत बराच बदल झालेला दिसत होता मला ! जंगलाच्या आतील भागात आमच्यासाठी खास बंगला होता. बंदूक, पिस्तुल्स तर सतत जवळ बाळगावी लागत होती. पण शैलेंद्र काही निराळाच वागत होता. आल्याबरोबर त्याने मला सांगून टाकले, 'अभिजित, आपण काही पाच वर्ष राहणार नाही इथे! फार कंटाळा आलाय या एकाकी जीवनाचा! अर्थात या जंगलातील सोकॉल्ड साहसी जीवनाचा फायदा घेऊन मगच मी राजीनामा देणार आहे. मला सारखं वाटतंय की आता मुंबईमध्ये वास्तव्य करावं.'

सुरुवातीच्या दोन–तीन महिन्यांत आम्ही बरीच माकडं, पोपट, हरीण वगैरे प्राणी झूकडे रवाना केले. हे प्राणी पकडताना तिथे असणाऱ्या अदिवासी लोकांची खूप मदत व्हायची. त्या दिवशी असेच झाले. तीन अस्वले आम्ही पकडली. पण मुंबईला फक्त दोनच पाठवायची अशी शैलेंद्रने ऑर्डर काढली. एक अस्वल स्वत:साठी बाळगायचा निश्चय त्याने केला. त्या अस्वलाचे त्याने नाव पण ठेवून टाकले... 'दर्शन!' मला तर गंमतच वाटायला लागली. मी गंमतीने त्याला म्हटलेसुद्धा 'काय शैलेंद्र, अस्वलाचा खेळ करायचाय वाटतं मुंबईत?' त्याने मिस्किलपणे नुसतेच डोळे मिचकावले.

त्यादिवशी सकाळी जंगलभर भटकून शिकारी पोषाखातच मी बंगल्याच्या फाटकात जीप लावली. समोरचे दृश्य पाहताच मी तिथेच थबकलो. अस्वलाच्या गळ्यात दोरी बांधून शैलेंद्र त्याला निरनिराळ्या कसरती करायला लावण्यात फार गुंगला होता. अर्थात ते निर्बुद्ध अस्वल त्याला अजिबात दाद देत नव्हते. त्यावर उपाय म्हणून शैलेंद्रने योजलेला उपाय फारच अघोरी होता. प्रेमाने त्याला वश करण्याऐवजी दुष्ट मार्गांचा अवलंब तो करीत होता. चटकन त्याने एक सुरी घेतली आणि अस्वलाच्या पायावर मारली. अस्वलाने जोराचा चित्कार केला. शैलेंद्रने त्याला मेजावरचा पेपर उचलून आणायला सांगितले. अस्वलाने त्याप्रमाणे केले.

माझ्याकडे लक्ष जाताच तो अधिकच खुषीत आला. त्याने आपल योजना मला समजावून सांगितली. असे अनेक दिवस गेले. जंगलात माझ्याबरोबर शैलेंद्र जरी येत असला तरी मनाने तो मुंबईतच वावरत होता. भरीस भर म्हणून तो दारूपण चिक्कार प्यायला लागला. दिवसातले कितीतरी तास तो व्हिस्की घेऊन धुंदीत पडलेला असे. पण त्याबरोबरच अस्वलाला मात्र शिकविण्याची त्याची चिकाटी दिवसेंदिवस वाढत होती. हळूहळू ते अस्वल ग्लास, चहा आणण्यापासून तो सिगारेट पेटवण्यापर्यंत सर्व कामे करू लागले. पण शैलेंद्रच्या ऑर्डर्स ऐकताना त्या अस्वलाच्या डोळ्यात उमटलेली ती भीतीची आणि तिरस्काराची छटा मला मात्र नेहमीच अस्वस्थ करीत असे. हळूहळू त्याच्या गळ्यात दोर बांधून कामे करून घेण्याच्या पद्धतीत शैलेंद्रने बदल केला. पण जवळ सुरा ठेवून तो अस्वलापुढे उगारण्याचा अभिनय मात्र तो सतत करीतच असे. त्याच कृतीची अस्वलाला जबरदस्त भीती बसलेली होती.

जंगली जनावराला संपूर्ण शहरी संस्कारानुसार वागायला लावून त्याचे प्रयोग मुंबईत करण्याची कल्पना शैलेंद्रच्या डोक्यात घोळत होती. पण त्याचबरोबर त्याचे दारूचे व्यसन मात्र यत्किंचितही कमी झालेले नव्हते. या बाबतीत मी त्याला खूप सांगून पाहिले. पण पालथ्या घड्यावर पाणी!

मंगळवार १५ ऑगस्टच्या त्या पौर्णिमेच्या रात्री आम्ही दोघेही बंगल्याच्या पोर्चमध्ये खुर्च्या टाकून बसलो होतो. एकीकडे व्हिस्कीचे घोट घेता घेता दोघांच्याही गप्पा चालल्या होत्या. चांदणं अगदी टिपूर पडलेलं होतं. झाडांच्या वेड्यावाकड्या सावल्यांचं भयानक नर्तन चाललेलं होतं.

मूडमध्ये येऊन शैलेंद्र सांगू लागला.

'अभिजित, बहुतेक या सात आठ दिवसांतच मी दर्शन अस्वलाला घेऊन मुंबईला जातोय. माझ्या दृष्टीने तो आता चांगलाच तयार झालाय! मी मध्येच म्हणालो, 'अरे पण शैलेन्, एवढा तातडीचा निर्णय घेऊ नकोस. राजीनाम्याचा विचार काढून टाक. चांगली सरकारी नोकरी आहे बाबा. पगार भरपूर आहे, विचार कर.'

पण शैलेंद्रने माझ्या बोलण्याकडे लक्षच दिले नाही. एक टाळी वाजवून त्याने अस्वलाला आणखी एक व्हिस्कीची बाटली आणि काजू आणायला फर्मावले. हळूहळू माझी पण त्या अस्वलाची भीती चेपली होती. गंमत म्हणजे एखाद्या आज्ञाधारक पोरांसारखे त्या अस्वलाने आमचे काम केले. आम्हा दोघांच्याही सिगरेटस् लायटरने पेटवल्या. पण या त्याच्या कामाबद्दल शैलेंद्रने त्याला कधी शाबासकी दिली नाही. मालकाची उर्मट भूमिकाच तो सतत वठवित होता. ते अस्वल याच बारक्या डोळ्यांची शैलेंद्रच्या सर्व हालचालींवर लक्ष ठेवीत असे. दारूच्या धुंदीत कित्येक तास पलंगावर पडलेल्या शैलेंद्रची पण त्या अस्वलाला सवय झालेली दिसत होती.

दुसऱ्या दिवशी तर त्या अस्वलाने गंमतच केली. सकाळीच उठून मी ब्रेकफास्ट घेण्यासाठी हॉलमध्ये आलो तर दर्शन अस्वल शैलेंद्रच्या खुर्चीवर हुबेहूब त्याच्याच स्टाईलने बसले होते. एका हातात पेपर आणि दुसऱ्या हातात कपबशी धरून कपाने चहा पिण्याचा प्रयत्न चालला होता त्याचा! मला अगदी मनापासून हसू आले त्याची ती स्टाईल पाहून. अर्थात् माझी चाहूल लागताच धडपडून उठला बिचारा तो!

शैलेंद्रला मुंबईला जायला आता फक्त तीनच दिवस राहिले होते. आमच्या बंगल्याच्या मागे एक मोठी बारव असून तिच्यात भरपूर पाणी आणि मगरी असत. बारव प्रचंड आणि मोठी होती. आसपास झाडी पण बरीच होती. माझी ड्यूटी संपवून मी परत आलो. हल्ली शैलेंद्र माझ्याबरोबर येतच नव्हता. दोघांनी जेवण उरकले आणि मी माझ्या खोलीत जाऊन झक्कपैकी ताणून दिली पण साधारण अर्ध्या ते एक तासातच दर्शन अस्वलाच्या किंकाळ्यांनी मला जाग आली. काय झाले म्हणून मी धडपडत बाहेर आलो तर शैलेंद्र आणि दर्शनचा कुठेच पत्ता नव्हता. पण त्याच्या वाढत्या किंकाळ्या मात्र बंगल्याच्या मागील बाजूने येत होत्या. मी तसाच तिकडे धावत गेलो आणि समोरचे दृश्य पाहताच अगदी हतबुद्ध झालो. एक क्षण मात्र शैलेंद्रच्या दुष्टपणाची अगदी चीड आली मला!

बारवेच्या अगदी जवळच झाडाला त्याने दर्शन अस्वलाला अगदी घट्ट बांधले होते. पाण्यातून एखादी मगर अगदी सहजपणे त्याच्याकडे येऊन त्याचा चट्टामट्टा करू शकत होती. त्या बारवेपासून काही अंतरावरच शैलेंद्र आरामखुर्ची टाकून बंदूक हातात घेऊन बसला होता. बंदुकीचा नेम अर्थात मगरीवर होता. ती मगर अगदी सावकाश अस्वलाच्या रोखाने सरकत होती. तिचे थंड डोळे अस्वलावर रोखलेले होते. त्याच्याजवळ येऊन एका विशिष्ट अंतरावर थांबून ती बहुतेक भक्ष्याचा अंदाज घेत होती. आणि तेवढ्यात शैलेंद्र बंदुकीचा बार हवेत काढी. त्या आवाजाने ती मगर परत मागे जायची. पण थोड्याच वेळात परत त्या अस्वलाकडे सरकू लागायची. मृत्युच्या भयाने ते अस्वल जिवाच्या आकांताने ओरडायचे आणि त्याचबरोबर शैलेंद्रच्या हसण्याचे आवाज पण! अर्थात मगर त्या अस्वलाच्या अगदी जवळ आलीच तर तो सहजपणे बंदुकीने गोळी घालून तिला ठार करू शकत होता. पण हे त्या निर्बुद्ध अस्वलाच्या कुठे लक्षात येत होते. ते बिचारे अधिकाधिक केविलवाणे होऊन भयाने नुसते थरथर कापत होते. हा प्रयोग सुमारे एक तासभर चालला होता. शेवटी ती मगर अस्वलाच्या अगदी जवळ येताच बंदुकीचा चाप ओढून शैलेंद्रने तिला ठार केले. अस्वल परत एकवार आर्त सुरात ओरडले. मग शैलेंद्रने त्याला मोकळे सोडताच भयाने थरथर कापत ते वेगाने बंगल्यामध्ये पळून गेले. एका तासात केवढे भयानक टेन्शन निर्माण केले होते शैलेंद्रने !!

'अस्वलाला माझ्या पूर्ण ताब्यात ठेवण्याचा हा शेवटचा एक प्रयोग होता...' हसत हसत माझ्याकडे येत शैलेंद्रने सांगितले. 'आता हा दर्शन कधीही माझ्या आज्ञेबाहेर जाणार नाही बघ...'

'अरे पण हा कसला भयानक प्रयोग? ते अस्वल भीतीनं नुसतं अर्धमेलं झालं होतं... आपल्याला नाही बुवा आवडल्या या तुझ्या काहीतरीच विचित्र कल्पना.' मी अगदी तीव्र सुरात माझी नापसंती दर्शविली. माझी अगदी ठाम समजूत

होती की जनावरं माणसाच्या लेव्हलपर्यंत येऊन शकत नाहीत. मानवी बुद्धिचं लेणं त्यांच्याजवळ मुळीच नाही. पण माझा हा मुद्दा शैलेंद्रला कधीच पटला नव्हता आणि आवडला नव्हता. त्या दिवसानंतर दुसऱ्या दिवशी अस्वलाच्या डोळ्यांतील भीतीबरोबरच तिरस्काराची छटा अधिकच गडद झाल्याचे मला उगीचच जाणवले होते.

मुंबईला जायला फक्त एकच दिवस शिल्लक होता. म्हणून आदल्या दिवशी आम्ही दोघांनी एकमेकांच्या सहवासात सबंध दिवस घालवायचे  ठरवले. पण एक चित्ता पकडला असल्याची बातमी आमच्या सहकारी लोकांनी सांगितल्यामुळं मला ताबडतोब तिथे जावे लागले. अर्थात संध्याकाळपर्यंत मी येतोच असे शैलेंद्रला सांगून मी ड्युटीवर गेलो.

परत येताना व्हिस्कीचे मस्त पेग घेऊन मटनाचे मस्त जेवण करायचे आणि परत एकवार शैलेंद्रला त्याच्या बेतापासून परावृत्त करायचे विचार डोक्यात घोळवितच मी ड्रायव्हिंग करीत होतो. फाटकातून आत शिरता शिरताच मी आरोळी दिली. 'चलो जल्दी करो शैलेन यार, बहोत भूख लगी है।' कसाही असला तरी माझा तो जानी दोस्तच होता की! बंगल्यात शिरतानासुद्धा मी त्याला सारखा हाका मारीत होतो. पण दे, एकदाही शैलेंद्रने प्रत्युत्तर दिले नाही. 'पडला असेल व्हिस्कीच्या तारेत!' असा विचार करून मी अगोदर माझ्या खोलीत जाऊन बूट काढले कमरेचा बेल्ट सोडीत तसाच त्याच्या खोलीत गेलो. विचार होता की त्याला आता मात्र जबरदस्तीने उठवायचे. आश्चर्य असं की दर्शन अस्वलाचाही कुठे आवाज येत नव्हता.

शेवटी एकदाचा त्याच्या खोलीत गेलो तर दार सताड उघडेच होते. समोरच्या दृश्यावरून मात्र मला एकदम अर्थबोध होईना. दर्शन अस्वल शैलेंद्रच्या पलंगावर बसून त्याने आदल्या दिवशी वापरलेल्या बंदुकीच्या चापाशी खाटखुट करीत होते. ते करताना त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या. शैलेंद्रचा पत्ताच नव्हता. जवळच्या टीपॉयवर मात्र व्हिस्कीची बाटली आणि रिकामा ग्लास दिसत होता. नेहमीप्रमाणे शैलेंद्रने नशापाणी केले होते. ते उघड होते. मग तो कुठे गेला होता?

'शैलेन...शैलेन...' माझा आवाज ऐकताच अस्वलाच्या हातातून बंदुक गळून पडली. ती परत कशीबशी हातात उचलून तो घाईघाईने माझ्याजवळ येऊन खिडकीबाहेर खुणा करू लागला. मला त्या कृतीचा प्रथम काहीच अर्थबोध होईना. शेवटी ती बंदूक माझ्या हातात देऊन तो बंदुकीचा घोडा मागे करू लागताच एक अभद्र शंका माझ्या मनात तरळून गेली. जोरात ओरडून मी त्याला विचारले, 'शैलेंद्र, कुठेय?' या प्रश्नावर त्याने नुसतेच डोके हलविले आणि पुन्हा त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. म्हणजे? काहीतरी भयानक प्रकार घडलेला दिसतोय्! आदल्या दिवशी तीन गोळ्या झाडून ठेवलेल्या त्या बंदुकीत अजूनही काही गोळ्या शिल्लक होत्या. पण चाप मात्र तिसरी गोळी मारताना पुढे रेटलेल्या स्थितीतच होता! याचा अर्थ चौथी गोळी झाडताना तो मागे करणे आवश्यक होते.

आता मात्र त्या अस्वलाने माझा शर्ट पकडला आणि तो मला खोलीतून बाहेर नेण्याचा प्रयत्न करू लागला. म्हणजे माझ्या मनाला आलेली दुष्ट शंका खरी ठरणार होती तर! क्षणाचाही विलंब न लावता बंदूक हातात घेऊन मी तसाच धावत सुटलो. बंगल्याच्या मागच्या बाजूस मी धडपडतच आलो ती या आशेने की शैलेंद्रचा जीव तरी वाचावा म्हणून!

समारेच्या भयानक दृश्याने माझी बोबडी वळली. शैलेंद्रचा मागमूसही नव्हता. फक्त बारवेच्या जवळच्या झाडाला दोर कुणाला तरी बांधावे असा बांधलेला होता आणि चेक्सचे डिझाईन असलेल्या शर्टची एक बाही फक्त फडफडत होती. बारवेतील पाण्यात मगरीचा संचार मात्र निर्वेध झाला.

क्षणार्धात सर्व प्रकारचा उलगडा मला झाला. आदल्या दिवशीचा प्रयोग दर्शन अस्वलाने जसाचा तसा शैलेंद्रवर केला होता. आदल्या दिवशी ज्या ठिकाणावर आरामखुर्ची ठेवून शैलेंद्र बसला होता तेथेच ती आरामखुर्ची पण दिसत होती. नक्कीच नेहमीप्रमाणे ड्रिंग घेऊन शैलेंद्र बेहोष होऊन पडलेला असणार. दर्शन अस्वलाने तसाच ओढत नेऊन त्याला झाडाला बांधलं असणार. पाण्यातील मगर कालच्याप्रमाणेच भक्ष्यावर थंड नजर टाकून पुढे पुढे येत असणार, दर्शन अस्वल आरामखुर्चीत बंदूक घेऊन बसले असणार. हेतू हा की आपण पण गोळी घालावी. सर्व हालचाली त्याने मानवी पद्धतीने केल्या. पण बंदुकीचा चाप मागे ओढून गोळी झाडावी लागते हे त्या मूर्ख आणि निर्बुद्ध प्राण्याच्या लक्षात आले नसणार! त्या सर्व गडबडीत त्या मगरीने पुढे येऊन केव्हाच शैलेंद्रला गट्ट केले असणार! दारुच्या बेहोषीतून तो जागा तरी झाला होता की नाही कुणास ठाऊक!

आदल्या दिवशी एक तासभर अस्वलाला यमप्राण यातना देणारा आणि खदखदा हसणारा शैलेंद्र माझ्या डोळ्यापुढे आला! दर्शन अस्वल माझ्याशेजारीच डोळे पुसत उभे होते. अस्वलाच्या डोळ्यांतील तिरस्काराचे रूपांतर कारुण्यात झाले होते. पण नियतीने केवढा भयानक सूड उगवला होता शैलेंद्रवर!... केवढा पराभव!! केवढा भयानक अंत!!

(टारझन – १९७६)